ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

दिला आहे . कोणत्याही शाखेतील शिक्षण असो जसे विज्ञान, तंत्रज्ञान किंवा मानव्य विद्या त्या शिक्षणाद्वारे नेमके काय साधायला हवे तर काही विशेष ज्ञाना सोबतच काहीतरी सामान्य (common) गुणांचा विकासही त्यात अभिप्रेत आहे, जे गुण सर्वात सामाईकपणे वृद्धींगत व्हायला हवे. सर्व साधारणपणे शिक्षणाचा हेतु हा माहिती मिळवणे, आजूबाजूच्या परिस्थितीची समज असणे, व्यक्ति मध्ये असणाऱ्या विविध क्षमतांचा विकास होणे, आणि त्याच बरोबरीने काही कौशल्ये त्यांनी हस्तगत करणे, विचारांची परिपक्वता असणे ही आवश्यक आहे. सर्व शिक्षित व्यक्ति मध्ये हे गुण सर्वसाधारणपणे असायलाच हवे मग त्यांनी निवडलेले क्षेत्र कोणतेही असो, किंवा कोणत्याही शाखेतील ते शिक्षण असो. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी नेमके काय साधायला हवे ह्या विषयाची स्पष्ट जाणीव आणि माहिती असणे आवश्यक आहे. शिक्षणाची शाखा विषय कोणतेही असो साहित्य ,विज्ञान,कला, मानव्य शाखा , तंत्रज्ञान वगैरे परंतु त्या शिक्षणाद्वारे सुसंस्कृतपणा, शहाणपणा(wisdom) आणि सुशिक्षितपणा ह्या सारख्या गुणांचा विकास होणे अपेक्षित आहे, आणि त्या शिवाय विद्यार्थ्यांचे कल्याण(wellbeing) साधले जावे.

मानवी कल्याणाचे विविध घटक आहे, मानवी कल्याणात त्याच्या शारीरिक, व्यावहारिक , सामाजिक, भावनिक , बौद्धिक , नैतिक , कलात्मक आणि आध्यात्मिक अंगाचा समावेश होतो.

**शारीरिक घटक (physical wellbeing )** – Health is wealth, शारीरिक कल्याण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातिल महत्वपूर्ण घटक आहे . शारीरिक आरोग्य हे चांगले असणे ही सर्वात मोठी संपत्ति मनाली जाते, शारीरिक स्वास्थ्यसाठी आपल्या शरीराची योग्य काळजी घेणे, नियमित व्यायाम, स्वच्छता या सारख्या प्राथमिक गोष्टी सोबतच शिक्षित व्यक्तीला शारीरिक स्वास्थ्य महत्वाचे कसे आहे याची योग्य समज असणे आवश्यक आहे, आहार, निद्रा, योग, ध्यान धारणा याचे योग्य पालन करणे आवश्यक आहे, नवीन शैक्षणिक धोरणात (4.44, 12.7, 20.5 ) योग , क्रीडा यासाठी आपल्या भारतीय ज्ञान भंडाराचा वापर करणे, विविध प्रकारचे clubs, मंडळे स्थापन करणे , अभ्यासक्रमात भारतीय पारंपरिक खेळ, स्थानीक ज्ञानाला महत्व व त्या द्वारे शारीरिक कल्याणचा विचार अंतर्भूत केला आहे . आजच्या काळातील बऱ्याच आरोग्य विषयक समस्यात झालेली वाढ हे दर्शवते की प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेत असतानाच चांगल्या आरोग्याच्या सवयीवर भर दिला गेला तर पुढची पिढी निश्चितच आरोग्य संपन्न बनेल. कोरोंना पाँडेमीकने शारीरिक स्वास्थ्य आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्व अधोरेखित केले आहे.

**व्यावहारिक ज्ञान** –सुशिक्षित व्यक्तीला व्यावहारिक ज्ञानातील कुशलता किवा कौशल्य असणे अपेक्षित आहे, केवळ माहितीचा भंडार असणे अपेक्षित नाही तर त्या माहितीचा योग्य ठिकाणी, योग्य वेळी, योग्य कारणासाठी वापर करता यायला हवा तेच सुशिक्षित व्यक्ति कडून अपेक्षित असते.

**सामाजिक कल्याण** –मानव हा सामाजिक प्राणी मानला जातो. समाजात राहूनच व्यक्तीचा विकास होत असतो, व्यक्ति ही ईतरांशी कशा प्रकारे वागते,संबंध ठेवते हे महत्वपूर्ण आहे, सुशिक्षित व्यक्तीला इतरांशी योग्य प्रकारे समायोजन साधता यायला हवे. प्रत्येक व्यक्ति ही वेगळी असते, प्रत्येकाचे आचार विचार वेगवेगळे असतात, शिक्षणाद्वारे व्यक्तीचा इतरांप्रति असलेला दृष्टिकोन संकुचित न

राहता व्यापक बनायला हवा. पूर्वग्रह दृष्टिकोनातून आपण इतरांकडे पाहतो का? याचे स्वपरीक्षण करता यायला हवे शिक्षणाद्वारे ते साध्य होणे आवश्यक आहे. समता,बंधुता, सर्वसामावेशकत्व या सारख्या मुल्याना प्रत्यक्षात आचरणात येण्यासारखी शिक्षण पद्धती हवी. नवीन शैक्षणिक धोरणात 6.1 मध्ये शिक्षणाद्वारे सामाजिक न्याय,समता प्रस्थापित व्हायला हवी, लिंगधारीत विषमता ही कमी होऊन सामाजिक प्रगती साधता यायला हवी,समाजातील तळागाळातील, सामाजिक आणि आर्थिक दुर्बल गटातील तसेच आदिवासी बालकांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रयत्न करण्यावर भर दिला गेला आहे.समाजाचा विकास होण्यासाठी शिक्षणाच्या सोईसुविधा सर्वांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. दुर्बल गटातील बालकाना शिक्षणाकडे आकर्षित करून घेण्याच्या ज्या योजना उदाहरणार्थ सायकल देणे, पालकांच्या खात्यात ठराविक रक्कम जमा करणे, खिचडीयोजना वगैरे काही भागात यशस्वीपणे राबवण्यात आल्या,त्या इतरही ठिकाणी राबवण्यात याव्यात असे ही नवीन शैक्षणिक धोरणात सुचवले आहे. सर्वसमावेशकता, समता या मुल्याना दिलेले महत्व यातून दिसून येते.

**भावनिक बुद्धिमत्ता** –व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात भावनावर योग्य नियंत्रण असणे आवश्यक आहे. व्यक्तीच्या आनंदी आणि यशस्वी जिवनासाठी भावनिक बुद्धिमतेचे महत्व असाधारण आहे. सुशिक्षित व्यक्तीला मोह,माया ,लोभ, क्रोध, वासना ई. विकारांवर योग्य रीतीने नियंत्रण राखता यायला हवे, नवीन शैक्षणिक धोरणात त्या साठी भारतीय मूल्य शिक्षणावर भर दिला जावा असे म्हटले आहे. उपनिषदातील श्रेयस, प्रेयस संकल्पना व्यक्तीला योग्य काय आणि प्रिय काय यातील भेद काय आहे ते शिकवते, आयुष्यात अनेक गोष्टींचे आकर्षण वाटत आसले तरी त्या योग्य आहे की नाही याची चिकित्सा ही सुशिक्षित व्यक्तिकडून अपेक्षित असते, शिक्षणाद्वारे हे साधता यायला हवे. मानवी विकारांवर काही अंशी विजय मिळविता येणे मानवी कल्याणाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. कामाच्या ठिकाणी जेव्हा व्यक्तीचा इतरांशी संबंध येतो किवा जेव्हा व्यक्ति टीम मध्ये काम करीत असते तेव्हा तर त्या व्यक्तीला स्वताच्या भाव भावनांवर नियंत्रण मिळविणे अत्यंत आवश्यक आहे, शिक्षणाद्वारे भावनिक बुद्धिमत्तेचा स्तर उंचावता यायला हवा . भावनांचे योग्य रीतीने समायोजन न साधल्या मुळे विद्यार्थ्यांना अनेक ताण तणावाना सामोरे जावे लागते, विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येचे वाढते प्रमाण हे दर्शवते की भावनिक व्यवस्थापन ही महत्वाचे आहे,ही काळाची गरज नवीन शैक्षणिक धोरणात ओळखली गेली आणि सर्व शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी कौंसेलिंग सेंटर असावे असे NEP-2020 च्या 12,4 मध्ये मांडण्यात आले आहे.

**बौद्धिक घटक** –नवीन शैक्षणिक धोरणात स्वतंत्रपणे आणि स्वेछेने अध्ययन करण्यावर भर दिला आहे. चिकित्सक आणि टिकात्मक विचारशैली विकसित करणे आवश्यक आहे. व्यक्ति जेव्हा स्वतः विचार न करता किंवा मूल्यमापन न करता आंधळेपणाने विश्वास ठेऊ लागते तेव्हा समाजात अंध श्रद्धा वाढीस लागते. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शिक्षण पद्धतीत त्यांना केवळ त्यांच्या कामासाठी लागणारे कारकून हवे होते जे निमूटपणे ऐकतील , स्वतंत्रपणे विचार करणारी व्यक्ति त्याच्या शिक्षण पद्धतीत अपेक्षित नव्हती , परंतु आज आपणास जर विज्ञान ,तंत्रज्ञान विकास किवा एकूणच मानवी कल्याण साधायचे असेल तर तार्किकतेवर आधारीत विचारसरणीचा समावेश शिक्षण व्यवस्थेत होणे गरजेचे आहे यावर नवीन शैक्षणीक धोरणात भर दिला आहे . तंत्रज्ञानातील वेगवान

प्रगतीमुळे सातत्याने नवीन बदल होत आहे, यांत्रिकीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग ,रोबोटिक्सच्या आजच्या युगात चिकित्सक, तार्किक विचारसरणी, समस्या निवारणाचे कौशल्य,संज्ञापन कौशल्य यांची विशेषत्वाने निकड भासणार आहे . उच्च गुणवत्ता असलेले उच्च शिक्षण ज्यात अचूक आकलन शक्ति विकसित होईल अशा शिक्षणाची आवश्यकता आहे. बौद्धिक क्षमतेचा विकास असा व्हावा की ज्या द्वारे व्यक्तीला स्वतःचे , समाजाचे आणि देशाचे कल्याण साधता येईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार फक्त काय शिकवले जावे ह्या पेक्षा कशा पद्धतीने शिकवले जावे यावर भर देण्याची गरज वर्तवली आहे, स्वतंत्रपणे विचार करणे , समस्या सोडविण्यासाठी नावीन्यपूर्ण पद्धतीने विचार करण्याची क्षमता विकसित होणे गरजेचे आहे .

**नैतिक घटक** – मानवी कल्याणात नैतिक घटकाची भूमिका महत्वाची आहे . नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय मूल्य व्यवस्थेचे, भारतीय संस्कृतीत रुजलेल्या मूल्यांवर भर देण्यात आला आहे . ज्ञान,प्रज्ञान आणि सत्य शोध हे मानवाचे उद्दिष्ट मानले आहे , नैतिकतेच्या पायावरच हे साध्य केले जाते यावर आपल्या भारतीय परंपरेत भर देण्यात आला आहे . नैतिक मूल्ये ही योग्य अयोग्यते मधील फरक स्पष्ट करतात .नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम असा असावा की त्या द्वारे विविध मूल्यांचा विकास व्हावा. विविध कौशल्ये आणि मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये बिंबवली जावी , इतरांचा आदर करणे, समता , सेवा, अहिंसा , शांती , मोठ्यांचा आदर करणे, निष्काम कर्म, सहिष्णुता वगैरे मूल्यांचे शिक्षण दिले जावे ह्या साठी जातक कथा ,हितोपदेश ,पंचतंत्र मधील कथांचा वापर करावा . समता ,बंधुता ,सामाजिक न्याय यावर ही NEP 2020 भर देते . सुसंस्कृतते साठी नैतिक मूल्य हे आधार स्तंभ आहेत . आपण कोणत्या प्रकारचा पर्याय स्वीकारतो ते आपल्या नैतिकतेवर आधारित आहे , नैतिक व्यक्तिला आपल्या कर्तव्याचे भान असते , केवळ स्वार्थ हिताचा विचार न करता व्यक्ति इतरांचा, समाजाचाही विचार करते .

**आध्यात्मिक घटक** -भारतीय परंपरेचे एक वैशिष्ट्यपूर्ण लक्षण म्हणजे त्यात बाह्य जगाच्या ज्ञानाचा शोध घेण्या बरोबर अंतर्गत जगाच्या शोधावर ही भर दिला आहे. छंदोग्य उपनिषद मध्ये नारद संनद ऋषिकडे जातात आणि सांगतात मला या जगातील सर्व भौतिक विषयाचे ज्ञान आहे परंतु मला आत्मज्ञान नाही त्यामुळे मला आनंद नाही, म्हणजेच माणसाने कितीही भौतिक प्रगती केली तरी जेव्हा त्याला काहीतरी अपूर्णतेची जाणीव होते किवा सत्य शोध, आत्मसाक्षात्कार, आनंद प्राप्ती, मानवी जीवनाचे प्रयोजन याचा शोध घ्यावासा वाटतो तेव्हा तो अध्यात्मिकतेकडे वळतो. आध्यात्मिक घटकातून पूर्णतेची अनुभूति त्याला मिळू शकते. भारताला आध्यात्मिक क्षेत्रात समृद्ध वारसा मिळाला आहे. समाजातील समस्या सोडविण्यासाठी तसेच समाजाच्या उद्धारासाठी आध्यात्मिक ज्ञान उपयुक्त असते. देशाच्या संस्कृतीत, इतिहासात आध्यात्मिक ज्ञानाच्या खुणा आढळतात. नवीन शैक्षणिक धोरणात आपल्या इतिहास ,परंपरा ,कला ,प्राचीन ज्ञानाच्या अध्यायनाला महत्व दिले आहे, आपल्या सांस्कृतिक वारस्याचा आपणास सार्थ अभिमान असायला हवा ही जाणीव विकसित होण्यावर नवीन शिक्षण पद्धतीत भर दिलेला आढळतो.

नवीन शैक्षणिक पद्धतीत व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर भर दीला आहे , केवळ नोकरी व्यवसायासाठी शिक्षण नसून शिक्षणाद्वारे

व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन मानवी कल्याण साधले जावे . नैतिक मूल्ये , लोकशाहीसाठी पूरक मूल्यांसोबतच सर्जनशील आणि तार्किक विचारसरणी विकसित व्हावी , नुसत्या पाठांतर पेक्षा संकल्पना समजून घेणे , केवळ नोकरी, व्यवसाय साठीच शिक्षण नसून खऱ्या अर्थाने एक संपन्न, सुशिक्षित व्यक्ति घडवणे ज्याला समाज भाना बरोबरच , पर्यावरण रक्षण ,इतरांच्या कल्याणाचा विचारही अभिप्रेत आहे.नवीन शालेय/महाविद्यालयीन संस्कृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संवेदनशील केले जाइल . शिक्षणात सर्वसामावेशकत्व आणले जाइल. शालेय अभ्यासक्रमात मानवी मूल्यांवरील साहित्याचा समावेश असेल. सर्व व्यक्तींचा आदर , सहानुभूति ,सहिष्णुता , मानवी हक्क, लैंगिक समानता , अहिंसा , जागतिक नागरिकत्व, समवेशकता , विविध संस्कृतीचे ज्ञान देखील समाविष्ट असेल . धर्म, भाषा ,लिंग ओळख वर आधारित कोणतेही पूर्वग्रह , आणि स्टीरियोटाइप अभ्यासक्रमातून टाळले जाइल.

सामाजिक स्तरावर उच्च शिक्षणाने विद्यार्थी प्रबुद्ध बनायला हवा जेणेकरून सामाजिक विकासात तरुण वर्ग सक्षम बनेल आणि पर्यायाने सजग ,जाणकार आणि कुशल असा युवा वर्ग बनेल जो कोणत्याही समस्येवर उपाय शोधू शकतो आणि योजना प्रत्यक्ष अंमलात आणू शकतो. शिक्षणाद्वारे हे साधता यायला हवे , उच्च शिक्षण हे ज्ञान निर्मिती सोबतच नव निर्मितीचा आधार बनला पाहिजे. उच्च शिक्षणाद्वारे सर्जनशीलता , नावीन्य पूर्ण रीतीने विचार करणे, समस्या सोडविण्याच्या कौशल्या द्वारे आर्थिक क्षेत्रात योगदान देता येईल, ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत बनेल. अर्थातच केवळ रोजगार मिळविण्यासाठी शिक्षण नसून शिक्षणाद्वारे अधिक चैतन्यशील, अधिक आनंदी, एकसंघ, सुसंस्कृत, नाविन्याला प्रोत्साहन देणारा प्रगतशील समाज आणि समृद्ध राष्ट्र बनेल .

NEP 2020 चे अजून एक वैशिष्ट म्हणजे यात **विश्वनागरीकत्व शिक्षणाचा** समावेश केला आहे, समकालीन जागतिक आव्हाने आणि समस्या यांचा अभ्यास आणि आकलन होईल. जागतिक समस्या जास्त चांगल्या रीतीने समजतील , जागतिक शांततेचे महत्व समजेल आणि त्यासाठी प्रयत्न केले जातील. समाजाच्या आर्थिक ,सामाजिक, राजकीय प्रगती आणि स्थैर्यसाठी युद्धविरोध , शांततावाद आवश्यक आहे.' हे विश्वची माझे घर' ची शिकवण देणारी आपली संस्कृति विश्वनागरीकत्वचे मूल्य जाणते . रशिया युक्रेनच्या युद्धाची झळ सर्वच राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने अनुभवली आहे. विश्वनागरीकत्व शिक्षणाने जागतिक शांतता, सहिष्णुता , सर्वसमावेशकतेचे महत्व वाढीस लागेल, सुरक्षित समाज उज्ज्वल भविष्याचे संकेत देतो.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा करत असताना व्यक्ति स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरता याची योग्य सांगड घातली जावी. नवीन शैक्षणिक धोरणात 21व्या शतकातील गरजा लक्षात घेतल्या आहेत . केवळ वाचन , लिखाण कौशल्याचा विकास न करता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल यावर भर दिला आहे. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्याबरोबरच समाजासाठी , देशासाठी भरीव योगदान दिले पाहिजे. शिक्षणाद्वारे व्यक्ति कल्याणासोबत समाजाचे, देशाचे आणि विश्व कल्याण ही साधले जावे हा व्यापक दृष्टिकोन नवीन शैक्षणिक धोरणात आढळतो .

नवीन शैक्षणिक धोरणात प्राचीन सांस्कृतिक मूल्य आणि एकविसाव्या शतकातील आव्हाने यांची सांगड घातली आहे . या नवीन धोरणाची अमलबजावणी हे मोठे आव्हान आहे , कोणत्याही व्यवस्थेत होणारा नवीन बदल लागलीच सर्व थरातून स्वीकारला जातो

असे नव्हे, शिक्षण व्यवस्थेतील हे बदल टप्याटप्या ने व्हायला हवे . हे बदल करत असताना प्राथमिकता कशाला द्यावी हे ठरवायला हवे , अॅकडमिक क्रेडिट बँक ची संकल्पना राबविताना आजही ग्रामीण आणि आदिवासी मुलांकडे इंटरनेट सुविधा पोहोचल्या नाही हे विसरता कामा नये.

सर्वांगीण विकासाचे ध्येय हे निश्चितच स्वागतार्ह आहे . शिक्षण व्यवस्थेत जे आमूलाग्र बदल होणार आहे त्याचे योग्य नियोजन होणे गरजेचे आहे. देशाच्या विकासात शिक्षणाचे योगदान महत्वपूर्ण आहे . सर्वच पातळीवरून राज्य ,केंद्र ,स्थानीक पातळीवरून जागृती करणे आणि त्या विषयीच्या माहितीचे , शंकांचे समाधान करणे आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमल बजावणी साठी लागणारे साहित्य , भौतिक सुविधा , प्रशिक्षण , भांडवल ह्याची योग्य तरदूत आवश्यक आहे . बालवाडी पासून ते महाविद्यालयीन पातळीवर अनेक सुधारणा बदल सुचवले गेले आहेत, या नवीन धोरणानुसार सुसंस्कृत , सुविद्य ,सुसंस्कारित ,सुशिक्षित ,समृद्ध ,बलशाली, आनंदी व्यक्ति , समाज आणि पर्यायाने सुफलाम ,सशक्त राष्ट्र निर्माण होईल अशी आशा करूया जिथे भेदराहित ,हिंसारहित समाज असेल जो जाती,धर्म, अंधश्रद्धा, शोषण यांच्या जाचक बेड्यातून मुक्त असेल . ह्या नवीन शिक्षणाद्वारे निर्भीड ,निर्भय समाज बनेल अशी आशा करूया .

**संदर्भ**


- https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf
- Dr. Usha Rao-Values in Education, Top Publication, Mumbai, 1999
- M.S.Kurhade- National Educational Policy 2020: Quantum leap towards a New Era , University News, 59(31) August 02-08,2021
- M.S.Kurhade-Ethics: The backbone of an Educated Society, University News, 59(36) September 06-12,2021


**Cite This Article:**
*डॉ. संगीता पांडे, (2022)* नवीन शैक्षणिक धोरण- 2020 : मानवी कल्याण आणि मूल्यविचार, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,****Volume No XI (Special Issue-I), 78-83.*